MAHARASHTRA ACT No X OF 1995

THE MAHARASHTRA OWNERSHIP FLATS (REGULATION OF THE PROMOTION OF CONSTRUCTION, SALE, MANAGEMENT AND TRANSFER) ACT, 1963.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक ८ जुलै १९९५ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**MAHARASHTRA ACT No X OF 1995**

**AN ACT TO EXTEND THE DURATION OF MAHARASHTRA OWNERSHIP FLATS (REGULATION OF THE PROMOTION OF CONSTRUCTION, SALE, MANAGEMENT AND TRANSFER) ACT, 1963.**

(राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १३ जुलै १९९५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला]

**सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०.**

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅट्सबाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन, देणे त्यांची विक्री, व्यवस्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासंबंधी) अधिनियम, १९६३, याची मुदत भूतलक्षी प्रभावाने वाढवण्याकरिता अधिनियम.**

१९६३ चा महा. ४५. ज्याअर्थी महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅट्सबाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासंबंधी) अधिनियम, १९६३, याची मुदत भूतलक्षी प्रभावाने आणखी वाढविणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सेहेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅट्सबाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासंबंधी) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढविणे) अधिनियम, १९९५ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो दिनांक १ एप्रिल १९९५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम १ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅट्सबाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासंबंधी) अधिनियम, १९६३ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम १ च्या पोट-कलम (४) मध्ये, "१९९५" या मजकुराऐवजी "२०००" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

व्यावृत्ती.

३. या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, कोणतीही व्यक्ती, तिने १ एप्रिल १९९५ रोजी प्रारंभ होणाऱ्या व राजपत्रामध्ये हा अधिनियम प्रसिद्ध झाल्याच्या तारखेस समाप्त होणाऱ्या कालावधीत केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीसंबंधातील कोणत्याही अपराधाबद्दल, जर अशी केलेली किंवा करण्याचे वर्जिलेली गोष्ट ही या अधिनियमाद्वारे मुख्य अधिनियमाची मुदत भूतलक्षी प्रभावाने वाढविण्यात आली नसती तर अपराध ठरली नसती तर, दोषसिद्ध ठरविली जाण्यास पात्र असणार नाही.

शंका दूर करणे.

४. शंका दूर करण्याकरिता याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, दिनांक ३१ मार्च १९९५ नंतर जो समाप्त होणार होता, त्या मुख्य अधिनियमांची मुदत दिनांक १ एप्रिल १९९५ या दिनांकापासून भूतलक्षी प्रभावाने वाढविल्यामुळे तो कोणत्याही वेळी समाप्त झाला होता असे कधीही मानले जाणार नाही व या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या व मुदत वाढविण्यात आलेल्या त्याच्या सर्व तरतुदी या अधिनियमाच्या कलम ३ च्या तरतुदींच्या अधीन राहून अखंडपणे अंमलात असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)
प. ग. पाटील,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.